# Executive Summary

**Name:- Prof. P.R. Junghare**

**Title Of Project:**

**Chhodo Bharat Andolanat Buldana.**

**File No. :- 23-587/12 (WRO)**

# संशोधन प्रकल्पाचा सारांश

१) इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. ब्रिटीश गृहखात्यातील अधिकारी ॲलन ह्युम याने त्यासाठी पुढाकार घेतला दरवर्षी राष्ट्रीय सभेची अधिवेशने वेगवेगळ्या शहरात आयोजित करण्यात येत होती. सुरूवातीला मुंबई, कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद इत्यादी ठिकाणी राष्ट्रीय सभेची अधिवेशने आयोजित करण्यात आली. नागपूरला आयोजित झालेल्या अधिवेशनानंतर राष्ट्रीय सभेची पाळेमुळे विदर्भात रूजण्याला सुरूवात झाली. इ. स. १८९३ च्या लाहोर अधिवेशनानंतर अधिवेशनाला गेलेल्या वऱ्हाडातील पुढाऱ्यांनी 'वऱ्हाड प्रांतीक काँग्रेस' ची स्थापना त्याद्वारे राष्ट्रीय सभेचे विचार आपल्या जिल्ह्यात पेरण्यास सुरूवात केली.

२) हिदुस्थानच्या राष्ट्रीय चळवळीचा इतिहास अभ्यासत असतांना १८९७ ते १९२० या कालखंडाला टिळक युग या नावाने संबोधतात. लोकमान्य टिळक जहालवादी विचाराचे नेते होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळणारच' हे त्याचे ब्रीद वाक्य होते. त्यासाठी टिळकांनी आपल्या चतु:सूत्रीचा विचार राष्ट्रीय सभेसमोर मांडला परंतू राष्ट्रीय सभेमधील मवाळ पुढाऱ्यांना टिळकांचे विचार मान्य झाले नाही. त्यामुळे १९०७ च्या सुरत अधिवेशनानंतर राष्ट्रीय सभेत दोन गट निर्माण झाले. अशावेळी बुलडाणा जिल्हा टिळकांच्या पाठीमागे उभा राहीला. जिल्ह्यात टिळकांना मानणारे डॉ. भाऊसाहेब पारसनिस, पं. पन्नालाल व्यास, दादासाहेब सोमन इ. नेते होते. त्यांनी टिळकांची विचारधारा उचलून धरली. शेगांवच्या संतश्रेष्ठ गजानन महाराजांचे आशिर्वाद लोकमान्य टिळकांनी घेऊन राजकीय संघर्षाला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून घेतले त्यामुळे विदर्भात टिळकांची कार्य सोपे झाले. टिळकांच्या मृत्युनंतर बुलडाणा जिल्हा पोरका झाला असे उदगार खामगांव येथील शोकसभेमध्ये डॉ. भाऊसाहेब पारसनिस यांनी काढले. यावरून लोकमान्य टिळकांच्या जिल्ह्यावरील प्रभावाची कल्पना येते.

३) गांधी युगात २४ जानेवारी १९२१ रोजी खामगांव मध्ये टिळक राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना झाली. स्वातंत्र्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या टिळकांच्या चतु:सूत्रीचा प्रभाव या विद्यालयाच्या स्थापने पाठीमागे होता. शाळेची स्थापना झाल्यानंतर शाळेची शिक्षक, विद्यार्थी ह्या सर्वांनी प्रत्येक आंदोलनामध्ये मोलाची कामगिरी बजावली. ग्रामउद्योगाला चालना दिली. या दरम्यान अनेक मान्यवरांनी शाळेला भेटी देऊन शाळेच्या कार्याची प्रसंशा केली.

४) १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचा मृत्यु झाला. टिळक युग संपले आणि गांधी युगाला सुरूवात झाली. महात्मा गांधीजीनी राष्ट्रीय सभेचे नेतृत्व स्विकारल्यानंतर सत्य,अहिंसा, सत्याग्रह या विचारधारेचा अवलंब करून इ. स. १९२० मध्ये असहकार चळवळ सुरू केली. चळवळ सुरु असतांना स्वदेशीचा पुरस्कार, परदेशी मालावर बहिष्कार, पदव्या व मान सन्मानाचा त्याग, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण इ. उपक्रम राबविण्यात आले. सुरुवातीला गांधी तत्वज्ञानाला विरोध झाला परंतू हळूहळू संपूर्ण जिल्हा गांधीमय झाला. जिल्ह्यात गांधीवादी नेतृत्व उदयाला आले. बुलडाण्याच्या यादव माधव काळे यांनी आपली कौन्सीलची उमेदवारी मागे घेतली. डॉ. पारसनिस यांच्यासह अनेक नेत्यांनी सरकारकडून प्राप्त झालेल्या पदव्याचा त्याग केला.

५) ज्याप्रमाणे गांधी विचारधारेला माननारा एक वर्ग बुलडाणा जिल्ह्यात निर्माण झाला. त्याचप्रमाणे गांधी विचारधारा मान्य नसणारा एक गटसुद्धा जिल्ह्यात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. बुलडाणा येथील रामचंद्र अनंत कानिटकर यांनी शेवटपर्यंत गांधी विचारधारा मान्य केली नाही. तसेच पं. पन्नालाल व्यास, दादासाहेब सोमन ह्या नेत्यांनी सुद्धा सुरूवातीला गांधी विचारधारा मान्य झाली नाही.

६) इ. स. १९३० मध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीला सुरूवात झाली. म. गांधीजीनी दांडी येथे जाऊन मिठाचा सत्याग्रह केला. सुरूवातीला साबरमती आश्रमातून निघाल्यानंतर गांधीसोबत ७९ अनुयायी होते. त्यातील दोन अनुयायी खामगांवच्या टिळक राष्ट्रीय शाळेचे माजी विद्यार्थी होते. या काळात गांधी विचाराचा प्रभाव संपूर्ण जिल्ह्यावर असल्याचे दिसून येते. सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या अनुसंगाने गांधी विचारधारेचा प्रसार करण्यासाठी अनेक उपक्रम या काळात बुलडाणा जिल्ह्यात राबविण्यात आले.

७) सविनय कायदेभंगाच्या चळवळीत राधाबाई ओक, प्रमिलाताई ओक, जिजीबाई देशपांडे, पार्वतीबाई पारसनिस, माईसाहेब कानिटकर, रूख्मिनीबाई कोरडे इ. महिलांनी दारूच्या दुकानासमोर निदर्शने केली. स्वदेशीचा पुरस्कार करून परदेशी मालावर बहिष्कार घालण्यातबाबत पुढाकार घेतल्याचे दिसून येते.

८) ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर महात्मा गांधीजींनी 'करा अथवा मरा' चा नारा दिल्यानंतर छोडो भारत आंदोलनाला सुरूवात झाली ह्या आंदोलनात बुलडाणा जिल्हयातील डॉ. पुरूषोत्तम एकबोटे, चंपतलाल मेवाडे, भाऊसाहेब सोमन, पंढरीनाथ पाटील, द्वारकाप्रसाद गुप्ता, रामचंद्र अनंत कानिटकर, पंडित दिनकर कानडेशास्त्री इत्यादी नेत्यांनी

आपआपल्या परिसरामध्ये चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून येते.

९) १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाला प्रारंभ झाल्यानंतर महात्मा गांधीजीच्या संदेशाचा प्रभाव संपूर्ण जिल्ह्यावर झाला आणि जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याने स्वातंत्र्याच्या या आंदोलनामध्ये उडी घेतली. त्यामध्ये खामगांव, मेहकर, चिखली, दे. राजा, मलकापूर, जळगांव जामोद इ. सर्व तालुक्यांनी तनमन धनाने गांधीजींचा संदेश प्रमाण मानून स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला.

१०) १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाचा प्रभाव तरूण वर्गावर मोठ्या प्रमाणावर झाला. आणि संपूर्ण देशातील तरूण वर्ग या आंदोलनात सक्रिय झाला. चळवळी दरम्यान अनेकांना विर मरन आले. बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूरचा पुंडलिक मराठा या तरूणालासुद्धा पोलीस गोळीबारात आपला जीव गमवावा लागला. ह्या आंदोलनातील पुंडलिक मराठा बुलडाणा जिल्ह्यातील पहिला हुतात्मा ठरला. या अगोदर सुखदेव गोरे नावांचा तरूणाने कायदेभंग आंदोलनात हौतात्म्य पत्करले.

११) १९४२ च्या छोडो भारत आंदोलनामध्ये उघडपणे काम करता येत नसल्यामुळे भूमिगत राहून कार्य करणाऱ्याची संख्या सुद्धा बुलडाणा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दिसून आली.

१२) महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या प्रत्येक आंदोलनामध्ये बुलडाणा जिल्ह्यातील स्त्रिया सक्रियपणे सहभागी झाल्याचे दिसून आले. वऱ्हाडची वाघीन म्हणून ओळखली जाणारी दुर्गाबाई जोशी, पार्वतीबाई पटवर्धन, प्रमिलाताई ओक, राधाबाई ओक इत्यादी महिलांनी बुलडाणा जिल्ह्यात ठिकठिकाणी सभा घेऊन प्रबोधन केले. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्याती प्रत्येक तालुक्यातून महिला समोर आल्यात. त्यामध्ये शांताबाई मेवाडे, जिजीबाई देशपांडे, पार्वतीबाई पत्की, पार्वतीबाई पारसनिस, कौशल्यबाई काशिनाथ आवटे, विमलाबाई देशपांडे, रूख्मिनीबाई कोरडे, इत्यादी महिलांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत सक्रियपणे भाग घेतल्याचे सिद्ध होते.

१३) मेहकर तालुक्यातील दे. माळी नावाचे गांव विशेष जागृत किंवा क्रियाशील असल्याचे लक्षात येते सुमारे तीन ते चार हजार लोकवस्ती असलेल्या या गावातील सात तरूणांनी १९४२ च्या आंदोलनात सक्रियपणे भाग घेतला. आश्रू मारोती खरात, रामचंद्र बाळाजी गिऱ्हे, नारायण बळीराम सुरूशे ह्या तरूणांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. नारायण बळीराम सुरूशे नावाच्या क्रातीकारी विचाराने भारलेल्या तरूणाने आपल्या गावात अनेक सामाजिक उपक्रम सुरू केले. उदा. रात्रशाळा, महिला मंडळ, ग्रामउद्योग, गोदरीमुक्त गांव, अपृश्यता निवारण, प्रवचन सप्ताह इ. तसेच भारत खटकेश्वर मंडळाची स्थापना सुद्धा दे. माळी मध्ये झाल्याचे दिसून येते.

१४) लोकजागृतीचे साधन म्हणून वर्तमान पत्राला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाला सुरूवात झाल्यानंतर ज्याप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रांनी देशात जनजागृतीचे काम केले. त्याचप्रमाणे बुलडाणा जिल्ह्यातील साप्ताहीक आणि वर्तमानपत्रांनी चळवळी दरम्यान मोलाची भूमिका बजावली. त्यामध्ये नवभारत, नवसमाज, राष्ट्रसेवक, समाजसेवक, शुभंकर, सुदीमा आणि निनाद इ. वर्तमान पत्राचा समावेश होता. त्याचप्रमाणे घोशल, महाराष्ट्र समाचार, लोकमत, मातृभूमी, उदय आणि केसरी इत्यादी जिल्ह्याबाहेरील वर्तमान पत्रांनी सुद्धा जनजागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर करून चळवळीला हातभार लावल्याचे दिसून येते.

१५) महात्मा गांधीजीच्या सिद्धांत आणि चळवळीचा प्रभाव बुलडाणा जिल्ह्यावर होऊन अनेक तरुणांनी राष्ट्र कार्यास वाहून घेतले. महात्मा गांधीजींचा संदेश प्रमाण मानून प्रत्येक तालुक्यातील तरुण गांधी विचारधारा स्वीकारत होते. खामगांव येथील डॉ.पु. ग. एकबोटे त्यापैकी एक होऊन त्यांनी स्वतःचा वैद्यकिय व्यवसाय बाजूला ठेऊन पूर्णपणे गांधी विचार धारेचा प्रसार आणि प्रचार हयातभर केला. तसेच मोताळा तालुक्यातील नारायण तोताराम जवरे या तरुणावर सुद्धा गांधी विचारधारेचा प्रभाव होऊन त्यांने १९४२ च्या चळवळीत सक्रियपणे भाग तर घेतलाच परंतू त्यानंतर मरेपर्यंत अंगावर मोजके कपडे घातले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नारायण जवरेची ओळख वऱ्हाडचा गांधी या नावाने होत होती.

१६) १९४२ च्या चले जाव आंदोलनामुळे लोकांच्या मनातील सरकारबाबतची भिती नष्ट झाली. पोलीसांना घाबरणारे लोक पोलीसाच्या लाठीमाराला सहज समोर जाऊ लागले. तरुंगात जाणे म्हणजे तीर्थक्षेत्राला जाणे अशाप्रकारची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या रोमहर्षक पर्वामध्ये १९४२ च्या आंदोलनाची नोंद सर्वात महत्वाची आहे. संपूर्ण देशात आपण आपले पुढारी ही संकल्पना स्वीकारत संपूर्ण देश या आंदोलनात सहभागी झाला आणि चलेजावचा इशारा इंग्रजांना देण्यात आला. इतिहासाच्या या सुवर्ण पानाचा धांडोळा घेत असतांनी बुलडाणा जिल्ह्याचे योगदान अधोरेखित होते. स्वातंत्र्य लढ्याचे स्फुलींग चेतवणाऱ्या या आंदोलनात बुलडाणा जिल्हा अग्रेसर असल्याचे सिद्ध होते.